

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन –संपादक

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१४ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# मोदी नसते तर राम मंदिराचा प्रश्न मार्गी लागला नसता–राज ठाकरे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पंतप्रधान नरेंद्र मोदी नसते तर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतरही राम मंदिराचा प्रश्न मार्गी लागला नसता, अशा शब्दात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मोदींचे कौतुक केले आहे. निकालानंतरही अनेक प्रलंबीत कामांप्रमाणे राम मंदिराचे काम प्रलंबीत राहिले असते, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे. गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांनी मोदींना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या वेळी ते माध्यमांशी बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या कार्यकाळातील पहिल्या पाच वर्षातील ज्या गोष्टी मला पटल्या नाहीत त्याता देखील मी विरोध केला. मात्र ज्या गोष्टी मला पटल्या, त्याबाबत मी कौतूकही केले होते, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. मला भूमिका बदलणे आवश्यक वाटले त्यामुळे मी भूमिका बदलली, असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना देखील मी काही मागितले नव्हते आणि कौतुक करतानाही मागितले नाही. जे मला आवश्यक वाटले ते मी केले, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

राज्यात आपल्याला धर्मावर राजकारण करायचे नाही. मात्र १९९२ पासून २०२४ पर्यंत रखडलेली एखादी गोष्ट, ज्यामध्ये अनेक कार सेवकांनी आपल्या प्राण्याची आहुती दिली. शरयू नदीमधील अनेक कार सेवकांची प्रेते तरंगत असल्याचे दूरदर्शनवर दाखवले जात होते. त्या सर्व कार सेवकांचा आत्मा आता शांत झाला असेल, असे म्हणत राज ठाकरे आणि राम मंदिर उभारण्याच्या भूमिकेला समर्थन दिले आहे. इतक्या वर्ष प्रलंबित असलेला राम मंदिराचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला असला तरी देखील उभे



राहिले नसते, असे म्हणत राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कामाचे कौतुक केले आहे. अनेक विषय अद्यापही पेंटिंग आहे तसाच राम मंदिराचा विषय देखील पेंडिंग राहिला असता, असे देखील राज ठाकरे यांनी म्हणाले. राम मंदिर असेल किंवा कलम ३७० असो, अशा सर्व महत्त्वाच्या निर्णयांचे मी आधी देखील गत केले असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.एका बाजूला कडगुळ आणि एका बाजूला खंबीर नेतृत्व त्यामुळे मी आणि पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. मोदी यांना पाठिंबा देताना महाराष्ट्रासाठी आमच्या काही महत्त्वाच्या मागण्या आहेत. त्या पंतप्रधान मोदींपर्यंत पोहोचतीलच, अशी अपेक्षा देखील राज ठाकरे यांनी व्यक्त केली. यामध्ये मराठी भाषेला राज भाषेचा दर्जा देणे, महाराष्ट्रातील गड किल्यांचे संवर्धन मादी महत्त्वाचे विषय असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र हे पूर्णपणे पुढारलेले राज्य आहे. उद्योग धंद्यामध्ये उद्योजकांना प्राधान्य द्यावे वाटेल, असे महाराष्ट्र एकमेव राज्य आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांना समान पाहणे आवश्यक असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातचे असल्याने त्या राज्याबद्दल त्यांच्या मनात विशेष प्रेम असणे हे साहजिक आहे. मात्र महाराष्ट्राकडे देखील तेवढ्याच तळमळीने लक्ष देणे आवश्यक असल्याची अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

कावीळ झालेल्या व्यक्तीला जग पिवळे दिसते. त्यामुळे जे आत्ताच जेलमधून बाहेर आले आहेत त्यांचा तसा विचार असू शकतो, असे म्हणत राज ठाकरे यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. संजय राऊत यांना कावीळ झाल्यामुळे त्यांना सर्व पिवळे दिसत असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## पुलगाव शहराच्या प्रमुख मार्गांवर पोलीस विभागाचे पथसंचलन

### शांती सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पुलगाव पोलीस प्रशासन पूर्ण पणे सज्ज

**पुलगाव । प्रतिनिधी**

आगामी काळात येणाऱ्या परम पूज्य आंबेडकर जयंती, रामनवमी आणि येणाऱ्या निवडणुकीत शांती व सुव्यवस्था पुलगाव शहरात कायम राहावी, या करिता आज दिनांक १३एप्रिल रोजी संध्याकाळी ४ वाजता पुलगाव पोलिस विभागा ने प्रमुख मार्गाने पथसंचलन केले.वर्धा जिल्हा हा गांधी जिल्हा असून येथिल शांती सुव्यवस्था राखून ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून प्रत्येक परिस्थिती ला हाताळण्यासाठी सक्षम आहे या वरून दिसून आले



या फ्लेग मार्च मध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी चौहान , पुलगाव पोलीस निरीक्षक सोनावणे अन्य सहायक पोलीस निरीक्षक आणि अन्य पोलीस कर्मचारी ने उपस्थिती राहून पुलगाव चा प्रमुख मार्गावर पथसंचलन केले.

## वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे पुढील ४ दिवस अवकाळीचे

**पुणे**–अवकाळी पावसाचे थैमान सुरूच आहे. विदर्भाला सलग पाचव्या दिवशी अवकाळी पावसाने झोडपले आहे. या अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. त्यातच आता आणखी चार दिवस राज्यावर अवकाळी पावसाचे सावट कायम असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे बळीराजाच्या चिंतेत आणखी वाढ होणार आहे.वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे पावसाला पोषक हवामानराज्यात पुढील तीन ते चार दिवस पावसाची शक्यता कायम आहे.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एमपीएससीत यश

### रोशन दुर्गे यांची कर सहाय्यक पदी निवड

**गडचिरोली । प्रतिनिधी**

सध्याच्या घडीला नोकरी मिळविणे फारच कठीण झाले आहे. त्यात बरेच तरुण–तरुणी अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून असतात. महाराष्ट्रात एमपीएससी मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळते. एमपीएससी मार्फत दरवर्षी हजारो पदांसाठी भरती केली जाते. यासाठी विद्यार्थी देखील अहोरात्र मेहनत घेत असतात.मात्र यातही काहींना यश मिळते, तर काहींच्या पदरी निराशा पडते. पण दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर डोंगराएवढ्या संकटाला भेदून यशाला गवसणी घालणं शक्य होते. याचेच एक उदाहरण पाहायला मिळाले.शेत मजुराच्या मुलाने कठोर परिश्रम घेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) परीक्षा उत्तीर्ण केली. त्याचे कर सहाय्यक पदी वर्णी लागली आहे.रोशन वामन दुर्गे रा.गोमणी ता.मुलचेरा, जिल्हा गडचिरोली असे त्याचे नाव आहे.

रोशन दुर्गे याचं बालपण गावातल्याच वस्तीवर गेलं.त्याचे प्राथमिक शिक्षण स्वगावी राजे धर्मराव प्राथमिक शाळेत झालं.त्यांनतर त्याच्या वडिलांनी गावातील भगवंतराव हायस्कुल येथे ८ व्या वर्गात नाव दाखल केले. इयत्ता ९ व्या वर्गात त्याने नवोदय विद्यालयची परीक्षा पास केली. नवोदय विद्यालय घोट येथे इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्याने वर्धा येथे बी ई (मेकॅनिकल इंजिनियर) केला.त्यानंतर त्याने चिमूर येथे एमएसडब्ल्यू केला. त्यानंतर त्यांनी २०१६ ते १८ दोन वर्ष नेहरू युवा केंद्र येथे युवा समन्वयक म्हणून काम केला.तर १ मार्च २०१९ ते ३० जून २०२२ पर्यंत त्याने महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती व चंद्रपूर तालुक्यातील दुर्गम भागात ग्राम विकासाबद्दल योगदान दिले. दरम्यान २०२२ मध्ये एमपीएससी परीक्षेत कर सहाय्यक व मंत्रालयीन लिपिक ही दोन पदे निघाली होती.कोरोना मुळे ही परीक्षा मार्च २०२३ ला घेण्यात आली. त्याचा निकाल नोव्हेंबर २०२३ ला जाहीर झाला असून त्यात त्याला घवघवीत यश मिळाले. १३ मार्च २०२४ रोजी कर सहाय्यक म्हणून त्याला नियुक्ती आदेश मिळाले असून नुकतेच १० एप्रिल रोजी तो विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगाव मुंबई येथे रुजू झाला.रोशन दुर्गे यांचे वडील शेत मजूर असून घरी



**विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे**

दरम्यान यश मिळाल्यानंतर त्याने आपलं हे यश आई–वडिलांच्या कष्टाचं चीज असल्याचे म्हटले.तर विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहून अभ्यासाकडे लक्ष द्यावे आणि आपला लक्ष केंद्रित करून त्याचा जिद्दीने पाठलाग करावा असा महत्त्वाचा सल्ला देखील त्याने दिला आहे.

पत्नी,दोन मुली,तीन मुलं असा भला मोठा परिवार.घरची परिस्थिती हलाखीची होती.मात्र आपल्या मुलांना खूप शिकवायचं वामन दुर्गे यांची मोठी इच्छा होती.वडिलांप्रमाणे मुलांना देखील शिक्षणात रस होता.त्यामुळेच सर्वच मुलं शिकले. घरातील एक मुलगी आरोग्य विभागात आरोग्य सेविका म्हणून काम करते.तर मोठा मुलगा सुशिक्षित असूनही नोकरी नसल्याने मजुरी करत आपला उदरनिर्वाह करतो.तर दुसरी मुलगी गृहिणी आहे.एक मुलगा नागपूर येथे रेल्वे मध्ये नोकरीला आहे.रोशन हा सर्वात लहान मुलगा असून त्याने इयत्ता नववी नंतर मागे वळून बघितले नाही. घरची हलाखीची परिस्थिती समजून घेऊन वडिलांवर बोझा न बनता त्याने बाहेरच्या बाहेरच काम करत शिक्षण घेतले. अखेर त्याच्या कठोर परिश्रमांना यश आले असून कर सहाय्यक पदी निवड झाल्याने सर्व स्तरावरून त्याचे कौतुक केले जात आहे.

## एकनाथ नेरकर यांचे निधन



**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील गिरगांव येथील प्रतिष्टीत नागरिक भाजपा कार्यकर्ते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे स्वयंसेवक तथा प्रगतेच्छुक शिंपी समाज विदर्भ संघटनेचे संस्थापक – उपाध्यक्ष,एकनाथ सिताराम नेरकर (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने दि.१३ एप्रिल शनिवार रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी १ वाजता गिरगांव स्मशान भूमीत अंत्य संस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी,एक मुलगा, एक मुलगी,नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## कवयित्री प्रज्ञा पंडित नव दुर्गा पुरस्काराने सन्मानित

**ठाणे । प्रतिनिधी**

काव्य , लेखन ,निवेदन , अध्यापन इत्यादी अनेक क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणाऱ्या कवयित्री – लेखिका – समिक्षिका प्रज्ञा मनिष पंडित यांना अत्यंत मानाच्या '' आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या ' नव दुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ठाणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात अतिशय उत्साही धार्मिक वातावरणात सुरू असलेल्या चैत्र नवरात्र उत्सवात शनिवार दिनांक१३ एप्रिल रोजी मा .खासदार श्री. राजन विचारे यांच्या मार्गदर्शनाने नवरत्न आणि नवदुर्गा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात ठाणे शहरातील कर्तृत्ववान स्त्रियांना (नवदुर्गा ) तर पुरुषांना ( नवरत्न ) पुरस्काराने गौरविण्यात आले.

'व्यक्त– अव्यक्त ' या काव्यसंग्रहाद्वारे साहित्यक्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रज्ञा पंडित यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे रसिकांनी जोरदार स्वागत केले. विश्वकोश च्या माजी अध्यक्षा लेखिका डॉ.विजया वाड यांनी या काव्यसंग्रहावर आपल्या पसंतीची मोहोर उमटविली होती. प्रज्ञा पंडित यांचे लेखन म्हणजे बावनकशी सोने असल्याचे गौरवोद्गार डॉ.



विजया वाड यांनी काढले होते. आतापर्यंत प्रज्ञाक्षरे ,काव्यलिपी , बाबा, मुलाखतीची गुरुकिल्ली , भारतीय खाद्यसंस्कृती अशी अठरा पुस्तके रसिकमान्य ठरलेली आहेत. ' इंग्रजी माझ्या खिशत', या पुस्तकाची सहावी आवृत्ती प्रकाशित झालेली असून ही पुस्तके महाराष्ट्रातील वर्ष दुर्गम भागातील शाळांमध्ये तसेच आदिवासी पाड्यांवरील विद्यार्थ्यांना सामाजिक संस्था तसेच दानशूर व्यक्तींच्या मदतीने विनामूल्य देण्यात येत आहेत. नेत्रतज्ञ डॉ.तात्याराव लहाने यांनी गावोगावी इंग्रजी माझ्या खिशात या उपक्रमाचे कौतुक केलेले आहे. प्रा.प्रज्ञा पंडित यांनी विविध विषयांवरील शोधनिबंध लिहिलेले आहेत.

' तेजस्वी फाऊंडेशन ' ' प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग ' आणि 'ऑल इंडिया पोएट्री असोसिएशन'च्या त्या अध्यक्षा असून साहित्यिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात त्या अनेक उपक्रम राबवत असतात.

ठाण्याच्या जोशी– बेडेकर कला– वाणिज्य महाविद्यालयातुन त्या अर्थशास्त्र या विषयात एम.ए. मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी एम.बी.ए.चे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून काही वर्षे त्यांनी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले आहे.

# गोंडपिपरीला दिलेला शब्द पाळला;कॉंग्रेसने काय दिले?–ना.सुधीर मुनगंटीवार यांचा खडा सवाल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गोंडपिपरीच्या सभेत विकासनिधी आणण्याचा शब्द मी दिला होता. २३ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी आणून मी शब्द पूर्ण केला, पण कॉंग्रेसच्या लोकप्रतिनिधीने काय केले?, असा खडा सवाल चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा क्षेत्राचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केला. मला लोकसभेत निवडून दिले तर गोंडपिपरीचा कायापालट होईल, असा विश्वास व्यक्त करून आपल्या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी १९ एप्रिलला कमळाचं बटण दाबा आणि पुन्हा एकदा मोदी सरकार आणा, असे आवाहनही त्यांनी केले.

गोंडपिपरी येथे गुरुवार, ११ एप्रिल रोजी आयोजित सभेला ना. मुनगंटीवार संबोधित करत होते. यावेळी माजी आमदार ॲड. संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, बबन निकोडे, अमर बोडलावार, चेतनसिंग गौर, मनिषा मडावी, मनिषा दुर्योधन, शारदा गरपल्लीवार, अश्विनी तोडासे, कोमल फरकाडे, सुरेखा श्रीकोंडावार व ॲड. अरुणा जांभुळकर आदींची उपस्थिती होती. प्रारंभी भाजपाचे युवा कार्यकर्ते स्व. प्रशांत येल्लेवार यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

गोंडपिपरी परिसराचा विकास करण्याची माझी तीव्र इच्छा असून हे कार्य तुमच्या आशीर्वादाशिवाय अशक्य आहे. १९ एप्रिलला मतदानाच्या दिवशी कमळ चिन्हाचे बटन दाबून जर तुम्ही मला निवडून दिले तर



गोंडपिपरीतील अपूर्ण कामे पूर्ण करेन. तुम्ही मला जेवढे मतदान कराल त्याच्या कित्येक पट भरभरून विकास आपल्या वाट्याला येईल. जो देशाच्या बाजूने उभा राहिला त्याच्या बाजूने हा देश उभा राहील, अशी सादही ना. मुनगंटीवार यांनी घातली.

एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र, सैनिक शाळा, बॉटनिकल गार्डन, मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, स्टेडियम, सामाजिक सभागृह, नाट्यगृह, चिचडोह प्रकल्प अशा अनेक विकास कामांचा उल्लेख करताना ना. मुनगंटीवार म्हणाले, विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार येणे निश्चित असून मोदीजींचा विकासरथ गोंडपिपरीपर्यंत आणण्याचे मी वचन देतो. मोदीजींना साजेसा खासदार तुम्ही निवडून दिला तर महिला, बेरोजगार, बचत गटांचा लोकसभेत आवाज बुलंद करेन. संसदेला चंद्रपूरचे दरवाजे लावलेले असल्यामुळे 'खुल जा सिमसिम' असे म्हणताच आपल्यासाठी अर्ध्या रात्रीही हे दरवाजे खुले होतील तसेच राज्य आणि केंद्राच्या तिजोरीतील निधी देखील गोंडपिपरीच्या विकासासाठी आणता येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

सह्याद्रीचा राखणदार




# देशवासीयांचे आदर्श व दिशादर्शक!

**भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागेल. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री. एन. के. कुमार गुरूजींचा हा लेख... संपादक.**

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत. डॉ.बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच



फुंकले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. इ.स.१९२७ ते १९५६पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. सन १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व द्रुगुणांपासून दूर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत. डॉ.बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ''आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!'' यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते. अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय. अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम! !! जयंतीनिमित्त विश्ववंद्य महामानवास विनम्र अभिवादन !!

# ग्रंथप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचं पुस्तक. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचं ते शिकवेल..डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

१४ एप्रिल,१८९१ रोजी मध्यप्रदेश मधील 'महु' येथे भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला. बालपणापासून वडील रामजी बाबा हे बाबासाहेबांच्या वाचन आणि अभ्यासाबाबत विशेष लक्ष देत, रामजी बाबा स्वतः पहाटे पर्यंत जागत, छोट्या भिवाला उठवत, अभ्यासाला बसवत आणि नंतर झोपत. बाबासाहेबांना हवी ती पुस्तके विकत आणून देत, मागितलेलं पुस्तक मिळालं नाही असं कधीच झालं नाही. कधी पैसे नसायचे अशावेळी रामजी बाबा मुंबईतच रहाणाऱ्या आपल्या दोन विवाहीत मुली तुळसा व मंजुळा यांच्या घरी जात, एका मुलीकडे पैसे मिळाले नाही तर त्यांना दुसऱ्या मुलीकडे चालत जावे लागे. दोघीकडे पैसे नसतील तर एखादा दागिना मागत, या दोन्ही मुली कोणताही आढावेढा न घेता आपला दागिना भावाच्या पुस्तकासाठी वडिंलांकडे देत. रामजी बाबा मग हा दागिना मारवाड्याकडे गहाण ठेवत आणि त्या पैश्यातून बाबासाहेबांनी मागितेलं पुस्तक घरी घेऊन येत. पैसे आल्यावर रामजी बाबा हा दागिना सोडवून मुलींना परत करत. काहीही झाले तरी बाबासाहेबांना अभ्यासात व वाचनात रामजी बाबांनी कधीच खंड पडू देत नसत. त्यामुळे बाबासाहेबांना लहानपणापासूनच वाचनाची आवड व संस्कार निर्माण झाले. रामजी बाबांनी त्यांच्याकडून तर्खडकरांची भाषांतर पाठमालेची तीन पुस्तके पाठ करून घेतली होती. तसेच योग्य वेळी योग्य व प्रभावी शब्दांचा उपयोग कसा करावा हे शिकवले होते. रात्रीचे जेवन झाल्यानंतर रामजी बाबा भिवाला संताचे अभंग आणि कबिरांचे दोहे म्हणायला लावत. त्यामुळे त्यांना तुकोबांची व संताची अभंग आणि कवने तोंडपाठ झाली होती. त्याविषयी बाबासाहेब म्हणत, 'वडीलांनी मला जे शिकवले तसे इतर कोणत्याही मास्तरांनी शिकवले नाही'. बाबासाहेबांच्या घरातील अभ्यास, वाचन आणि ग्रंथाविषयची ही जागरूकता क्रांतिकारक होती. बाबासाहेब आपल्या कुटुंबासमवेत मुंबईतील परळच्या आठ बाय आठ च्या खोलीत राहात. अशा परस्थितीतही ते कधी वाचनापासून विचलित झाले नाहीत. इ.स.१९०७ मध्ये ते दहावीची परीक्षा तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. तेव्हा चाळीतील लोकांनी त्यांच्या वडीलांची इच्छा नसतानाही कृष्णाजी अर्जुन केळुसकरांच्या हस्ते सत्कार केला, तेव्हा केळुसकरांनी बाबासाहेबांना एक बुद्धचारित्र बक्षीस दिलं. हे पुस्तक वाचल्यानंतर बाबासाहेबांवर बुद्धांचा मोठा प्रभाव पडला. वाचनाची गोडी अधिक वाढत गेली. बाबासाहेब मुंबई येथील चरणी रोडवरील गार्डनमध्ये सायं. ४ ते ९ यावेळेत रोज पाच तास वाचन करायचे. केळुस्कर गुरुजी संध्याकाळी तिथे फेरफटका मारण्यासाठी जात. त्यांना वाचनात गुंग असणारा हा छोटा भिवा पाहून त्यांना विलक्षण आनंद व कौतुक वाटे, आपल्या जवळील पुस्तके ते वाचण्यासाठी देत. वाचन हा व्यासंग पुढे बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यभर जपला आणि जोपासला. वास्तवात दहावीच्या परीक्षेत अवांतर वाचण्याच्या सवयीमुळे टक्केवारी कमी आली असली तरी हेच अवांतर वाचन बाबासाहेबांना महामानव या सर्वोच्च उपाधी पर्यंत घेऊन गेले, हे आपल्याला दुर्लक्षित करून चालणार नाही.बाबासाहेब परदेशात शिकायला होते, तेव्हा त्यांच्याकडे पुस्तके खरेदीसाठी पैसे नसत. रात्रभर एकाच बैठकीत ते पुस्तक वाचत, पुन्हा हे पुस्तक आपल्याला कधीच मिळणार नाही, म्हणून एकाग्रपणे वाचून नोट्स काढत. तसेच ग्रंथालय जितका वेळ उघडे असेल तितका वेळ ग्रंथालयात वाचत बसत, त्यांनी दररोज १८ तास अभ्यास केला. पुस्तक वाचातांना कशाचेच भान राहत नसे. भूक लागली तर मध्येच खिशातून पाव काढून गुपचूप खात असत. लंडनमध्ये घडलेली एक छोटी घटना आहे. बाबासाहेब, लंचब्रेकमध्ये ग्रंथालयात बसून ब्रेड खाताना ग्रंथपाल यहुदी पहातात, तेव्हा ग्रंथपाल म्हणतात, मिस्टर, हे ग्रंथालय आहे. येथे तुम्हाला खाता येणार नाही. तुम्ही नियम मोडला आहे, तेव्हा आता तुम्हाला शिक्षा करावी लागेल. त्यावर बाबासाहेब उत्तरले, क्षमा करा..! यापुढे मी नियम पाळील. उपाशीच वाचत बसेन. मग तर झाल ?



अपराध करणार्याला क्षमा नाही. ग्रंथपाल म्हणाला. शिक्षा करा पण पण महोदय आपणास एकच विनंती आहे. बाबासाहेब म्हणतात. कोणती? ग्रंथापालने विचारले. माझ्यासाठी हे ग्रंथालय बंद करू नका. ग्रंथांशिवाय मी जगू शकत नाही. याव्यतिरिक्त कोणतीही शिक्षा भोगायला मी तयार आहे. - बाबासाहेब म्हणाले. ग्रंथांसाठीचे प्रेम पाहून ग्रंथपाल नरमले व म्हणाले - मिस्टर आंबेडकर, उद्यापासून तुम्ही माझ्यासोबत जेवायचे. तुमचा डब्बा मी आणत जाईल हीच तुमची शिक्षा. हे ऐकून बाबासाहेबांचे डोळे पाणावले व त्यांनी ग्रंथपालाच्या हात हातात घेऊन कृतज्ञता मानली. लंडनमध्ये असतांना बाबासाहेबांनी पोटाला चिमटा देऊन मोठ्या कष्टाने दुर्मिळ पुस्तके जमवले, हे सर्व पुस्तके तीन पेट्यांमध्ये भरून 'व्हिक्टरी ऑफ इंडिया' या बोटीने मायदेशी पाठविली, परंतु ही बोट समुद्रात बुडाली.



डॉ.प्रकाश खेत्री,
छ.संभाजीनगर,
७८४३०९२२४४

तेव्हा ते या दुर्मिळ पुस्तकांच्या विरहात ते दोन दिवस रडत होते. अमेरिकेत असतांना त्यांनी ग्रंथांचं प्रचंड वाचन केलं. या वाचनातून जो थोडा वेळ त्यांना मिळायचा त्या वेळात ते रस्त्यांवरुन फिरुन ग्रंथ गोळा करायचे. अशी सुमारे २००० ग्रंथ त्यांनी अमेरिकेतून विकत आणले होते. पुस्तकांवर त्यांचे पराकोटीच प्रेम होते. ते म्हणत, लोकांनी माझी अवहेलना केली पण या पुस्तकांनी मला ज्ञान दिलं. म्हणून मी पुस्तकांच्या बाबतीत इतका जागरूक आहे. पुढे ते म्हणतात, जर माझ्या घरावर जप्ती आली आणि तर माझ्या सर्व चीज वस्तू नेल्या तर मी शांत बसेन पण माझ्या पुस्तकांना कोणी हात लावला तर मी ते कदापि सहन करणार नाही. अभ्यासात बाबासाहेबांना व्यत्यय अजिबात आवडत नसे. लंडन ते मुंबई अशा सलग ६४ तासाच्या बोट प्रवासात बाबासाहेबांनी ८ हजार पाने वाचून काढली होती. देवी दयाल लिखित 'डेली रुटीन ऑफ डॉ. आंबेडकर' या पुस्तकात तसा उल्लेख आढळतो. बाबासाहेबांना आपल्या वाचन व्यासंगापायी आपले 'चारमिनार' नावाचे घर विकावे लागले होते, इंग्लडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी भारताला राजकीय अधिकार देण्याच्या संदर्भात विचारविमर्श करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा केली. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सदस्य म्हणून ५ ऑगस्ट, १९२८ ला मुंबई विधिमंडळातून निवड झाली. बाबासाहेबांना जाणीव झाली की, आता भारतीय राजकारणात संविधानाचा विषय फार मोठ्या प्रमाणात चर्चेत येईल. अशा वेळी मौन राहणे, अत्यंत धोक्याचे आहे. तेव्हा ६ आणि ७ ऑगस्टला आपल्या काही मित्रांकडून ४०० रुपये उधार घेतले. ८ ऑगस्टला दिल्लीच्या तारापूरवाला बुकसेलर्सच्या दुकानातून ८५० रूपयांची संविधानाशी संबंधित पुस्तके विकत घेतली. अर्थात उरलेले ४५० रु उधार ठेवून ! जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करण्यासाठी बाबासाहेबांनी ९ ऑगस्ट पासून १४ दिवस खोलीला बाहेरून कुलूप लावून स्वतः ला कोंडून घेतले, त्यावेळी त्यांना एका लहान खिडकीतून चहा व जेवनाची व्यवस्था केली होती आणि १५-२० ग्रंथांचा अभ्यास केला. या प्रसंगातून बाबासाहेबांची लेखन व वाचनाची निष्टा, एकाग्रता किती पराकोटीची होती हे लक्षात येते. तारापूरवाला बुकसेलर्सकडून नंतरही बरीच नवीन पुस्तके खरेदी केली. तेव्हा या दुकानदाराची उधारी ८००० ते ९००० वर गेली. तेव्हा उधारीचे पैसे परत करण्यासाठी घर विकल्याशिवाय पर्याय नव्हता, १९३६ मध्ये 'चारमिनार' हे घर अक्षरश: ग्रंथाच्या उधारीपोटी विकावे लागले. माणूस स्वत:ला राहण्यासाठी घर बांधतो. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आवडत्या ग्रंथांसाठी 'राजगृह' हे दुमजली घर बांधले. त्याकाळात हिंदुस्थानातील पुस्तकांसाठी बांधलेलं हे पहिलं घर असावं. खालचा मजला माणसांसाठी तर दुसरा संपूर्ण मजला पुस्तकांसाठी राखीव होता. बाबासाहेबांच्याच हयातीत ५०,००० हजारांहून अधिक ग्रंथ राजगृहात दाखल झाले होते. राजगृहाच्या या ग्रंथालयामध्ये बाबासाहेबांच्या गैरहजेरीमध्ये कोणासही जाण्यास परवनगी वा मुभा नव्हती. राजगृहाच्या दाराशी कुत्रा पीटर हा बाबासाहेबांच्या ग्रंथालयाचे राखण करीत असे. एवढ्या प्रचंड ग्रंथ भांडारामध्ये कोणतेही पुस्तक हवे असल्यास त्यांना अचूक मिळत असे, इंग्लंडच्या ठक्कर कंपनीतून त्यांनी त्यासाठी खास ग्रंथालय कार्डे बनवून घेतली होती. श.शा.रेगे यांच्याकडे ती जबाबदारी सोपवून ती यादी पूर्ण करून घेतली होती. तेव्हा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे म्हणतात, मी जेव्हा डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी त्यांच्या राजगृहात गेलो, तेव्हा मी एका भल्या मोठ्या ग्रंथालयात आलो की काय ! असा भाव मला झाला. त्यांच्यासारख्या विद्यासंपन्न पुरूष जगात दुसरा असू शकत नाही. पुढे नियतकालिकात लिहतात, 'आंबेडकर घरात नव्हे तर ग्रंथालयात राहतात'. 'ग्रंथासाठी घर बांधणारे व घर विकणारे' ते जगाच्या पातळीवरील एकमेव 'महामानव' आहेत. बाबासाहेबांनी आपल्या मिळकतीतील बहुतेक खर्च पुस्तकांवर केला. एकदा बाबासाहेब हे ग्रंथ खरेदी करण्यासाठी पत्नीचे दगिने गहाण ठेवून पुस्तकांचे घरी गठे घेऊन आले, त्यावेळी त्यांच्या वहीणी रागा-रागात म्हणतात, तुम्ही पुस्तकांसाठी सर्व घराची राखरांगोळी करीत आहात, पुढे आपले कसे होणार ? त्यावर बाबासाहेब उत्तर देत की, मी माझ्या पुस्तकावर जेवढे प्रेम करतो, तेवढेच बायको व मुलगा यांच्यावरही करतो. यावरून बाबासाहेबांचे कुटुंबा एवढेच ग्रंथावर प्रेम होते हे लक्षात येते. बाबासाहेबांची ११०० ग्रंथ मिलिंदच्या ग्रंथालयास व सिद्धार्थ महाविद्यालयास बहुमोल ग्रंथसंग्रह दिली, तेव्हा बाबासाहेब अत्यंत भावविवश झाले होते. 'समाजाने बहिष्कृत केलेल्या माझ्यासारख्याला या ग्रंथांनीच जवळ केले. मला आसरा दिला. त्यांच्या एवढा जगात मला दुसरा परमस्नेही कोणीच नाही. माझ्या जीवनातील स्नेही आज मी तुम्हाला देत आहे', असे उद्गार बाबासाहेबांनी तेव्हा काढले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी ग्रंथसंग्रह दोन लाख आताच्या हिशेबात वीस कोटी रुपयांना विकत घ्यायची इच्छा व्यक्त केली होती. बाबासाहेबांनी ती अमान्य तर केलीच. परंतु, त्यावेळेला त्यांनी जे उत्तर दिले, ते त्यांच्यातील ज्ञान, तपस्वीपणाची साक्ष देणारे ठरले. ते म्हणाले, 'ग्रंथसंग्रह जाणे म्हणजे माझ्या शरीरातून प्राण जाण्यासारखे आहे'. बाबासाहेबांचे हे वाचन, व्यासंग आणि ग्रंथप्रेमाचा वसा आणि वारसा आपण सर्वांनी १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने जपायला हवा. तेव्हा बाबासाहेबांची जयंती नाचून साजरी करण्यापेक्षा वाचून साजरीकेली पहिजे, हीच खरी आदरांजली ठरेल...!

# महाकाली यात्रेच्या पार्श्वभुमीवर वाहतूक व्यवस्थेत बदल

## नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

**चंद्रपूर**-चंद्रपूर शहरात १४ एप्रिल २०२४ पासून महाकाली यात्रेस प्रारंभ होत आहे. अनेक वर्षांची परंपरा लाभलेल्या या यात्रेसाठी राज्याच्या विविध भागातून भाविकांचे जत्थे दाखल होणे सुरू झाल्याने महाराष्ट्र पोलिस अधिनियम-१९५१ च्या कलम-३३(१)(ब) नुसार सार्वजनिक ठिकाणी सुरळीत रहदारी व सुव्यवस्था राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व नियमनासाठी १४ ते २३ एप्रिल २०२४ पर्यंत वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येत आहे. याबाबतच्या सूचना पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी निर्गमित केल्या आहेत. सदर कालावधीत अंचलेश्वर गेट ते बागला चौक हा मार्ग सायकल खेरीज सर्व वाहनांकरीता बंद राहणार असून अंचलेश्वर गेट ते बागला चौक हा मार्ग नो पार्कंग झोन म्हणून घोषित करण्यात येत आहे. बागला नगर, महाकाली वार्ड, भिवापूर वार्ड या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी शहरात जाण्यासाठी व परत येण्यासाठी भिवापूर-हनुमान खिडकी-दादमहल वार्ड या मार्गाचा वापर करावा. सदरचा मार्ग हा मोटार सायकल व ऑटो यासाठीच राहील. बागला नगर, महाकाली वार्ड, भिवापूर वार्ड या यात्रा परिसरात राहणाऱ्या नागरिकांना चारचाकी वाहनांने शहरात किंवा बाहेर जायचे असल्यास लालपेठ कॉलरी-पठाणपुरा गेट-गांधी चौक या मार्गाचा वापर करावा. तसेच शहराबाहेर इतरत्र जायचे असल्यास कामगार चौक मार्गे बायपास रोडचा वापर करावा.यात्रेकरीता बाहेरून येणाऱ्या वाहनांची पार्किंग व्यवस्था ( नियोजीत वाहनतळ ) : नागपुर मार्गे येणाऱ्या वाहनांकरीता ( कोहिनुर तलाव मैदान ), बल्लारशा मार्गे येणाऱ्या वाहनांकरीता ( महाकाली पोलिस चौकी ते इंजिनिअरींग कॉलेज रोडचे बाजुस ), बल्लारपुर मार्गे येणाऱ्या वाहनांकरीता (बाबुपेठ पोलीस चौकी ) (डी.एड. कॉलेज) तसेच संपुर्ण यात्रा स्पेशल राज्य परीवहन बसेस करीता (न्यु इंग्लीश हायस्कूल मैदान ) या नियोजीत स्थळी पार्कींगची व्यवस्था करण्यात आली आहे, याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी व निर्देशांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

# निवडणुकीची टक्केवारी वाढविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांची बैठक

**चंद्रपूर**-चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योगांचे जाळे पसरले असल्यामुळे येथे कामगारांची संख्या खुप मोठी आहे. मतदानाच्या दिवशी म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली असून औद्योगिक आस्थापनांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

नियोजन भवन येथे आयोजित बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्याम वाखर्डे, शिक्षणाधिकारी (माध्य.) निकिता ठाकरे तसेच औद्योगिक क्षेत्रातील विविध संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

औद्योगिक संस्थांनी त्यांच्या स्तरावर एक स्वीप नोडल अधिका-याची नेमणूक करावी. तसेच १३ - चंद्रपूर लोकसभा क्षेत्रांतर्गत गत निवडणूकीमध्ये ज्या मतदान केंद्रावर ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते, अशा मतदान केंद्र परिसरातील मतदारांमध्ये उत्साह निर्माण व्हावा व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळ्या थीम ठेवून त्यावर आधारीत मतदान केंद्र करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सुचना बैठकीत देण्यात आल्या. यावेळी औद्योगिक संस्थेस मतदान केंद्र निश्चित करून देण्यात आले.

मतदानाच्या दिवशी मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सुट्टी देण्यात येते किंवा कामाच्या ठिकाणी योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये संस्था, खासगी आस्थापना



इत्यादी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निर्दशनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित रहावे लागते. हे लक्षात घेता, या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे.

ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे.

# जागतिक कीर्तीचा असा महामानव होणे नाही–डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन म्हणजे भारतीय जनतेच्या समतेच्या लढयाची अविस्मरणीय गाथाच होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. तीच त्यांनी संविधानेत साकारली जे–जे आपणांसी ठावे, ते–ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण' हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगितला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेला कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मिक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना (कायदामंत्री) असतांना शेडयुल्ड कास्ट फेडरेशन काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत निष्ठा जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले पाहिजे. त्याला कारण ही तसेच ते म्हणाले, मी प्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीयच! अशा महान विद्यात्याला वगळून खरोखरच हा देश मोठा झाला असता काय ? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र–शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. त्यांच्या ठायी असलेल्या अर्थकारणामुळे भारतीय रिजर्व्ह बँक उदयास आली, हे ही विसरुन चालणार नाही. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत. ही त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल, जी जगमान्य ठरली.

डॉ. बाबासाहेबांनी बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचे कडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडील आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला. बडोद्याच्या प्रागतिक राजे सयाजीराव साहेबांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. पैसा जमवला व १९२० साली ते अपुरा अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे. १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी होय. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन–तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली



कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी दिली.

त्यानंतर त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले. प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. थोडीशी खटपट करुन त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमही विधायक आणि व्यापक भूमिका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत:हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली.

आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते. चले जाव चा नारा देऊन इंग्रजांना देश सोडावा लागला आणि नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. त्यात बॅरी. तेजपाल सप्रु, बॅरी. जयकर आणि बॅरि. आंबेडकर हे होते. परंतु उर्वरित दोन तज्ञांनी नकार दिल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरुंनी ही जबाबदारी बॅरी. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली.

त्यांनी अहोरात्र जिद्द व चिकाटीने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना कायदेमंत्री पद बहाल करण्यात आले. १९५० पासुन राज्यघटना अंमलात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळे भारताला जगात नावलौकिक मिळाले, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही. तेव्हापासुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही आणि एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू 'भारतीय' हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे. तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही, दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे, म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानांचा तसेच सामाजिक/राजकिय संघर्षाचा वारसा लाभलेला असल्यामुळे हा समुह मूळत: प्रस्थापित विरोधी आहे, त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता. भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते, त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु, कारण या धर्माचे लोन जागतिक पातळीवर उंचावले आहे.

बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ति, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान, अभ्यासक, बुध्दिमान, कायदेपंडीत, स्मृतीकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक, ग्रंथाकार, निधडया छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या अवतार कार्याचा संदेश सर्व जगात पसरविणारा, पददलितांचे स्फूर्ती व आशास्थान अशा या जागतिक कीर्तीच्या महामानवाला १३३ व्या जयंती निमीत्त मानाचा मुजरा !

## पायोनियर स्कूल य.मंगेवाडीचे ३ विद्यार्थी एनएमएमएस व सारथी शिष्यवृत्तीस पात्र

**सांगोला । प्रतिनिधी**

खंडोबा बहुउद्देशीय संस्थेच्या पायोनियर इंग्लिश, सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल व पायोनियर निवासी गुरुकुल य.मंगेवाडी येथील इयत्ता आठवी ३ विद्यार्थ्यांनी छचचड व सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. परीक्षेला बसलेल्या १४ पैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर ३ विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले आहेत.



प्रणिती राजेंद्र पवार ही ६०,००० हजार रुपये ची एनएमएमएस शिष्यवृत्ती साठी पात्र ठरली आहे. निधिशा संभाजी बाबर ही ३८ , ५०० ची सारथी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरली आहे.तर सुमित शिवाजी बाबर हा देखील ३८ ,५०० रुपये ची सारथी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरला आहे. स्पर्धा परीक्षा कोणतीही असो त्यात पायोनियर चे विद्यार्थी गुणवत्ता यादीत येतातच हे वारंवार सिद्ध झाले आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांचे आई – वडील आणि त्यांचे शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थांच्या यशाचे पालक व ग्रामस्थांनी कौतुक केले आहे.पायोनियर स्कूल मध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व त्यांच्यातील कौशल्य ओळखून त्यांना परिपक्व व गुणवंत बनवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधून सर्वगुणसंपन्न बनविले जाते.मुख्याध्यापक अनिल येलपले सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख आशुतोष रुपनर सर , माध्यमिक विभाग प्रमुख प्रवीण कोरे सर , पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख वैशाली येलपले मॅडम प्राथमिक विभाग प्रमुख राऊत मॅडम व सर्व मार्गदर्शक शिक्षक यांच्या परीश्रमाने विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले.

## उद्योगपतींचे कर्ज माफ होतं, मग शेतकऱ्यांचे का नाही?–राहुल गांधी

**भंडारा**–आम्ही अदानींचे नव्हे शेतकरी, गरीब, बेरोजगारांचे सरकार चालवणार आहे, असे म्हणत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. अग्निवीर ही लष्करातील नव्हे मोदींच्या डोक्यातील योजना आहे, आमचे सरकार आल्यावर आम्ही अग्निवीर योजना बंद करणार, आम्ही हरितक्रांती, दूधक्रांती, बँकांचे राष्ट्रीयीकरण करतो तर मोदी धर्मावर २४ तास बोलतात, असेही राहुल गांधी म्हणाले.



पहिल्या टप्प्यातील महाराष्ट्रातील पाच मतदारसंघाच्या मतदानासाठी अवघे पाच दिवस शिल्लक राहिले आहेत. नुकतेच चंद्रपूर आणि नागपुरच्या कन्हान येथे पंतप्रधानांच्या दोन भव्य सभा पार पडल्यानंतर आता काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी हे देखील मैदानात उतरले आहेत. भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे राहुल गांधी यांची आज सभा पार पडली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजप सरकारच्या नीतींवर जोरदार हल्लाबोल केला. राहुल यांनी पीएम मोदी यांनी देशामध्ये चेष्ठा लावल्याची टीका केली. कोरोनामध्ये हजारो माणसे मरत असताना थाळ्या, टाळ्या वाजवायला सांगितल्याची टीका त्यांनी केली. राहुल यांनी सत्तेत येताच अग्नीवीर योजना घोषणा रद्द करणार असल्याचेही सांगितले. देशातील उद्योगपतींचे कर्ज माफ होत असतानाच शेतकऱ्यांचे का होत नाही? अशी विचारणा करताना त्यांनी ज्या पद्धतीने आम्ही पहिली कर्जमाफी दिली त्या पद्धतीने कर्जमाफी देऊ, असेही सांगितले.राहुल म्हणाले की, गेल्या १० वर्षांत मोदीजी यांनी काही निवडक करोडपती उद्योगपती अदानी यांच्यासाठी सरकार चालवले. मोदीचं सरकार आलं तर अदानींचे शेअरचे भाव वाढतात, हे अदानीचं सरकार आहे. सीबीआय, ईडीचा दबाव आणून मुंबईचं विमानतळ अदानींकडे दिलं आहे. भारतातील सर्व पोर्ट यांच्या हातात आहेत. त्यांनी सांगितले की, देशातील आज २२ असे लोकांकडे जेवढी संपत्ती आहे. तेवढीच संपत्ती या देशातील ७० टक्के लोकांकडे आहे. मोदी धर्म आणि हिंदू मुस्लीम यांच्यावर चर्चा करतात. जीएसटीच्या रुपाने तुमच्याकडील पैसे जातात. तुम्ही तेवढा कर देता, जेवढे गौतम अदानी देतात, असेही त्यांनी सांगितले.

# विद्यापीठ आपल्या गावात उपक्रमाची खेमजई येथे सुरुवात







**गडचिरोली**–अत्यंत गरिबी आणि संधीचा अभाव यामुळे पदवी प्राप्त करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा विद्यापीठ आपल्या गावात हा उपक्रम राबविल्या जात आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन वरोरा तालुक्यातील खेमजई या गावात करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आमुदाला चंद्रमौली यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रंजना लाड, सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रवीण मुधोळकर, आदर्श पदवी महाविद्यालयाचे समन्वयक भरत घेर, गुरुदास आडे, सामाजिक कार्यकर्ता डॉ. प्रमोद गंपावार, खेमजई ग्रामपंचायतच्या सरपंचा सौ. मनीषा चौधरी तसेच नागरीक उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना डॉ. चंद्रमौली म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातंर्गत सुरू केलेला हा अभिनव अभ्यासक्रम पुस्तकी शिक्षणाचा अतिरेक टाळून यामध्ये कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य, उद्योगाच्या संधी याबाबतच्या ज्ञानासोबत पदवी प्राप्त होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रंजना लाड यांनी खेमजई गावाचे आनंद निकेतन महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंध आणि शिबिरांमध्ये मिळालेले सहकार्य याचा विशेषत्वाने उल्लेख केला.

आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी ग्रामीण भागातील पदवी शिक्षणाच्या कमतरतेवर चिंता व्यक्त करत विद्यापीठाच्या या नाविण्यपुर्ण उपक्रमामुळे शिक्षण प्रक्रिया गतीमान होईल आणि शिक्षणाची उणीव भरून निघेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला. तसेच संध्याकाळी ६ ते ९ या कालावधीत सदर वर्ग घेण्यात येईल अशी माहिती त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. डॉ. प्रवीण मुधोळकर यांच्याद्वारे ग्रामीण विकास या विषयावर माहिती देऊन या अभ्यासक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत घेर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन रमेश चौधरी यांनी तर आभार बी.ए अभ्यासक्रमाचा विद्यार्थी सुधीर नन्नावरे यांनी मानले. तत्पूर्वी, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाला अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## निवडणुकीसाठी मतदान यंत्र सज्ज

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मशीन तयार करण्याची प्रक्रिया

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी केवळ एक आठवडा शिल्लक आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्हा प्रशासन अहोरात्र राबत आहे. याच अनुषंगाने मतदानासाठी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया सर्व विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. चंद्रपूर मतदारसंघातील ३८३ मतदान केंद्रासाठी मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालय येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत पार पडली. दोन दिवसांत संपूर्ण मशीन सज्ज करून चंद्रपूर येथे १९ हजार मतांचे मॉक पोलसुध्दा करण्यात आले.

१३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालयात ११ आणि १२ एप्रिल रोजी घेण्यात आली. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात एकूण ३८३ मतदान केंद्र आहेत. यासाठी ४७८ बॅलेट युनिट, ४७८ कंट्रोल युनीट आणि ५१७ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत. मशीन तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे एकूण ३० टेबल लावण्यात आले होते. प्रत्येक टेबलवर ३ कर्मचारी याप्रमाणे एकूण ९० कर्मचा-यांमार्फत ईव्हीएम, व्हीव्हीपॅटसह मशीन सज्ज करण्यात आली. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील ३८३ मतदान केंद्रासाठी असलेल्या ईव्हीएमपैकी ५ टक्के म्हणजे १९ मशीन मॉक पोलकरीता रॅन्डम पध्दतीने निवडण्यात आले. प्रत्येक मशीनवर १००० याप्रमाणे दोन दिवसांत १९ मशीनवर १९ हजार मॉक पोल घेण्यात आले.अशी असते प्रक्रिया : ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया ही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर केली जाते. यात मतपत्रिका बॅलेट युनीटला लावून सील करणे, प्रत्येक उमेदवाराला मतदान करून बघणे (मॉक पोल), मतदान झाल्यानंतर व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्या आणि ईव्हीएम चा डाटा जुळवून बघणे. त्यानंतर कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट आणि व्हीव्हीपॅट सील करून स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात येते. प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान पथकाला मशीनचे वाटप केले जाते.जिल्हाधिका-यांच्या समक्ष प्रक्रिया : जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी स्वत: समोर मशीन तयार करण्याची प्रकिया करून घेतली. मशीनला व्यवस्थित सिलींग करणे जेणेकरून मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तसेच मॉक पोल होतांना व्हीव्हीपॅट काम करते की नाही, याची काटेकोरपणे तपासणी करावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.यावेळी सहायक जिल्हाधिकारी रंजित यादव, सहायक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार आदी उपस्थित होते.



## प्रत्येक मतदारसंघात विशेष मतदान केंद्र

# महिला, दिव्यांग व युवा व्यवस्थापित मतदान केंद्राचे नियोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मतदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तशी निवडणूक विषयक कामांची लगबग सुध्दा वाढली आहे. जिल्हा प्रशासनाने मतदान केंद्रात किमान सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील सहाही मतदारसंघात विशेष मतदान केंद्र राहणार असून यात आदर्श मतदान केंद्रासह महिला, दिव्यांग व युवा व्यवस्थापित मतदान केंद्राचा समावेश आहे.

१३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक आदर्श मतदान केंद्र, महिला व्यवस्थापित एक मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापित एक मतदान केंद्र आणि युवा कर्मचारी व्यवस्थापित एक मतदान केंद्र याप्रमाणे लोकसभा मतदारसंघात एकूण २४ मतदान केंद्र विशेष राहणार आहे.




मतदारसंघनिहाय आदर्श मतदान केंद्र : राजूरा विधानसभा मतदारसंघात बामणवाडा येथे आदर्श मतदान केंद्र राहणार आहे. चंद्रपूर मतदारसंघात पोलिस कल्याण हॉल, चंद्रपूर येथे, बल्लारपूर मतदारसंघात बालविकास प्राथ. शाळा रुम नं. १, मूल येथे, वरोरा मतदारसंघात कर्मवीर प्राथ. विद्यालय रुम. नं. ४, वरोरा येथे, वणी मतदारसंघात जि.प.बांधकाम विभाग कार्यालय रुम नं. ४ वणी तर आर्णि मतदारसंघात एसपीएम गर्ल्स प्राय. स्कूल बिल्डींग रुम नं. १, घाटंजी येथे आदर्श मतदान केंद्र राहणार आहे.

आदर्श मतदान केंद्रात रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, स्वतंत्र प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, पाळणाघर, उष्मघातापासून वाचण्यासाठी सूचना फलक, पुरेशी प्रकाश व्यवथा, पिण्याच्या पाण्याची सुविधा व इतर बाबी राहणार आहेत.

महिला कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र : राजूरा विधानसभा मतदारसंघात महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल रुम नं. १, राजुरा येथे महिला कर्मचा-यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. चंद्रपूर मतदारसंघात सेंट मायकल कॉन्व्हेंट रुम नं. १, चंद्रपूर येथे, बल्लारपूर मतदारसंघात नगर परिषद मूल रुम नं. १ येथे, वरोरा मतदारसंघात लोकमान्य वरिष्ठ महाविद्यालय रुम नं. ३ वरोरा येथे, वणी मतदारसंघात पी.एस. वणी ऑफिस बिल्डींग (मध्यभाग) येथे तर आर्णि मतदारसंघात जि.प. शासकीय विद्यालय रुम नं. २, पांढरकवडा येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन महिलांचे राहणार आहे.

दिव्यांग कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र : राजूरा विधानसभा मतदारसंघात महात्मा जि.प. उच्च प्राथ. शाळा रुम नं. १, कोरपना येथे दिव्यांग कर्मचा-यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. चंद्रपूर मतदारसंघात वन अकादमी रुम नं. २, चंद्रपूर येथे, बल्लारपूर मतदारसंघात जि.प. प्राथमिक स्कूल, सोमनाथ प्रकल्प येथे, वरोरा मतदारसंघात जि.प. प्राथ. स्कूल रुम नं. १, आनंदवन येथे, वणी मतदारसंघात जि.प. बांधकाम विभाग कार्यालय रुम नं. ३ येथे तर आर्णि मतदारसंघात म्युनिसीपल उर्दु स्कूल रुम नं. २, पांढरकवडा येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन दिव्यांग कर्मचा-यांचे राहणार आहे.

युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र : राजूरा विधानसभा मतदारसंघात जि.प. प्राथमिक शाळा नवीन इमारत रुम नं. १, अवालपूर येथे युवा कर्मचा-यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. चंद्रपूर मतदारसंघात डॉन इंग्लिश कॉन्व्हेंट, पोलिस लाईन तुकम, चंद्रपूर येथे, बल्लारपूर मतदारसंघात नगर पंचायत सभागृह, पोंभुर्णा येथे, वरोरा मतदारसंघात पंचायत समिती कार्यालय, नवीन बिल्डींग रुम नं. १, वरोरा येथे, वणी मतदारसंघात राणी लक्ष्मीबाई प्राथ. हिंदी स्कूल क्रमांक १०, रुम नं. ३ येथे तर आर्णि मतदारसंघात एमडी विद्यालय रुम नं. १, गांधी नगर, आर्णि येथे युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र राहणार आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतच्या तारखेत बदल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

५ मे व १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतच्या तारखेत बदल करण्यात आला असून आता राष्ट्रीय लोक अदालत ही २७ जुलै व २८ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. हा बदल राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार करण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दिनांक ५ मे २०२४ आणि १४ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. परंतु महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार दिनांक ५ मे २०२४ रोजी होणारी लोकअदालतच्या तारखेत बदल होऊन दिनांक २७ जुलै २०२४ रोजी आणि दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी होणारी लोकअदालत २८ सप्टेंबर २०२४ रोजी ठेवण्यात आलेली आहे.



जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा एस. एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनानुसार चंद्रपूर शहर व जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात असून यात विधिज्ञ, पक्षकार व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी व ज्या नागरिकांना आपली प्रकरणे सदर लोकअदालतीमध्ये ठेवायची असतील त्यांनी संबंधित न्यायालयात किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर येथे स्वतः येऊन किंवा हेल्पलाईन फोन नंबर ०७१७२-२७१६७९ कार्यालयीन मोबाईल क्रमांक ८५९१९०३९३४ वर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी केले आहे.

# मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात निर्बंध लागू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू असून १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चे २ ) मधील नियम १४४ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हा न्यायदंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्बंध लागू केले आहेत. सदर प्रतिबंधात्मक निर्बंध १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजतापासून १९ एप्रिल २०२४ रोजी मतदानाची संपूर्ण प्रक्रिया पार पडेपर्यंत लागू असणार आहेत.

या कालावधीत बेकायदेशीर जमाव जमविण्यास व सार्वजनिक प्रचार सभा आयोजनास बंदी राहणार असून मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्या साध्या पांढऱ्या कागदावर असणे आवश्यक आहे तसेच त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव मुद्रीत करण्यावर बंदी असणार आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात निवडणूक कर्तव्यावरील वाहन वगळता इतर सर्व वाहनांस बंदी राहणार आहे. मतदान केंद्रात मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक / मतदान प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळविलेल्या व्यक्तींनाच प्रवेश राहणार आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रात प्रवेशावर बंदी असेल.

मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी करणे तसेच मतदान केंद्राच्या १०० मिटर परीसरात प्रचार करण्यास बंदी राहणार आहे. मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर ने-आण करण्याच्या प्रथेस पायबंद घालण्यासाठी टॅक्सी, खाजगी कार, ट्रक, ऑटोरिक्शा, मिनी बस, स्टेशन व्हॅन, स्कुटर, मोटार सायकल इत्यादी सर्व प्रकारच्या वाहनांवर बंदी राहणार आहे. मतदानाच्या दिवशी ओळख चिठ्ठया वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान केंद्राचे परीसरात भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करण्यास बंदी असणार आहे. ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली असेल, अशी कोणतीही व्यक्ती त्याच्या सुरक्षा कर्मचा-यासह मतदान केंद्राच्या १०० मीटर परीसरात प्रवेश करणार नाही. तसेच अशी व्यक्ती मतदार असली तरी निव्वळ मतदान करण्याकरीता सुरक्षा कर्मचा-यासह मतदार केंद्र परिसरात ये-जा करण्यावर निर्बंध राहील, तथापी विशेष सुरक्षा व्यवस्था प्रदान केलेल्या व्यक्तीच्या विशेष सुरक्षा पथकास (उश्रीश झींशलींळेप ढशरा) शस्त्रांसह मतदान केंद्राचे केवळ दारापर्यंत संरक्षित व्यक्तीसोबत जाता येईल. व एका वैयक्तिक सुरक्षा अधिका-यास शस्त्राचे प्रदर्शन न करता तसेच मतदान प्रक्रियेत कोणताही प्रकारे अडथळा न करता संरक्षित व्यक्तीस ( झींशलींशश ) मतदान केंद्रात सोबत करता येईल.

ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आलेली असेल किंवा त्या व्यक्तिकडे खाजगी सुरक्षा रक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तिस निवडणूक प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यास बंदी राहील. मतदान केंद्रात मतदानाचे दिवशी मोबाईल / स्मार्ट फोन / वायरलेस सेट इत्यादी नेण्यास प्रतिबंध राहील. मतदान केंद्राध्यक्ष / आचारसंहिता / कायदा व सुव्यवस्था पथक प्रमुख / निवडणुकीच्या कर्तव्यावरील सुरक्षा कर्मचारी यांना उक्त प्रतिबंध लागू राहणार नाही.

निर्बंधाच्या कालावधीत या बाबींवर बंदी नाही : १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघात निवडणूक प्रचार दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ पासून बंद होत असला तरी, घरोघरी प्रचारावर निर्बंधाच्या कालावधीत प्रतिबंध असणार नाही परंतू ५ पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास प्रतिबंध असेल. दवाखान्याच्या गाड्या, म्बुलन्स, दुधगाडया, पाण्याचे टँकर्स, विद्युत विभाग / पोलिस / निवडणूक कर्मचारी यांच्या वाहनावर बंदी राहणार नाही. विहीत मार्गाने जाणा-या बस गाडयावर बंदी राहणार नाही. टॅक्सी इत्यादी वाहने बस स्टेशन / रेल्वे स्टेशन / हॉस्पीटल कडे जाणारी वाहने यावर बंदी राहणार नाही. दिव्यांग / आजारी व्यक्तिस मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी जाणे-येणे करीता आजारी / दिव्यांग व्यक्तींच्या वैयक्तिक वाहनास बंदी असणार नाही.

# गृह मतदानाबाबत दिव्यांग व वृध्द मतदारांना आनंद


**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता जिल्हा निवडणूक यंत्रणा, ८५ वर्षांवरील आणि दिव्यांग मतदारांचे मतदान नोंदविण्यासाठी घरोघरी जात आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच अनुभव असल्यामुळे गृहमतदान करणा-या वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांनी या प्रक्रियेबाबत आनंद व्यक्त केला आहे.

'मी पूर्णपणे दिव्यांग आहे, स्वत:च्या पायावर किंवा कशाचाही आधाराने उभी राहू शकत नाही, त्यामुळे मतदान केंद्रावर जाऊ शकत नव्हती, आज प्रशासनाने घरी येऊन मत नोंदविले, याचा अतिशय आनंद आहे' अशा भावना व्यक्त केल्या महाराष्ट्र – तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या महाराजगुडा येथील सुरेखा तुकाराम राठोड (वय ४०) या दिव्यांग असलेल्या महिलेने.

'मतदानासाठी लोक घरी आले, आम्ही म्हटलं, बापू मतदानासाठी आम्हाले मतदान केंद्रावर जाता येत नाही, त्यांनी घरी येऊन आमच्या दोघांचे मत घेतलं, आम्हाला आनंद झाला', असे मत व्यक्त केले नारपठार (विजयगुडा) येथील संग्राम कोरपल्लीवार (वय ८९) आणि मुद्रीकाबाई संग्राम कोरपल्लीवार (८५) या वयोवृद्ध जोडप्याने. तर खांडरे ले-आऊट, शिवछत्रपती नगर, चंद्रपूर येथील रहिवासी अनंत देविदास कावळे आजोबा म्हणाले, 'माझे वय ९० च्या वर असून आज घरून मतदान केलं, याचा अतिशय आनंद झाला'.

होय, सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. याच अनुषंगाने चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात ८ एप्रिल पासून गृह मतदानाला सुरूवात झाली. आतापर्यंत चार दिवसात



एकूण ११८५ मतदारांनी गृह मतदानाद्वारे आपले मत नोंदविले असून यात १०२५ मतदार ८५ वर्षांवरील तर १६० मतदार दिव्यांग आहेत.

तालुकानिहाय गृहमतदानाची संख्या : राजुरा विधानसभा मतदारसंघात ८५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेले ३१० मतदार आणि दिव्यांग २१ असे एकूण ३३१ मतदारांनी गृहमतदानातून मत नोंदविले आहे. चंद्रपूर मतदारसंघात ८५ वर्षांवरील १६७, दिव्यांग १५ असे एकूण १८२ मतदार, बल्लारपूर मतदारसंघात ८५ वर्षांवरील १८६, दिव्यांग ५६ असे एकूण २४२ मतदार, वरोरा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २००, दिव्यांग ३९ असे एकूण २३९ मतदार, वणी मतदारसंघात ८५ वर्षांवरील ८९, दिव्यांग १७ असे एकूण १०६ मतदार तर आर्णी विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ७३, दिव्यांग १२ असे एकूण ८५ मतदारांनी गृह मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदविला.

मतदानाची गोपनीयता : गृह मतदान करतांना मतदान प्रक्रियेची गोपनीयता पाळण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार फॉर्म १३ - ए (डिक्लेरेशन), फॉर्म १३ - बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म १३ - सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म १३ - डी (मतदान कसे करायचे याबाबत सुचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचा-यांनी सुरवातीला मतदारांना माहिती दिली. यावेळी घरामध्ये स्थापन केलेल्या मतदान कक्षामध्ये सदर मतदारांनी आपले मत नोंदविले. यावेळी मतदान करतांना कोणताही दुसरा व्यक्ती त्यांच्याजवळपास नव्हता. मतपत्रिका घडी केल्यानंतर सदर मतपत्रिका छोट्या लिफाफामध्ये आणि नंतर मोठ्या लिफाफामध्ये टाकून मतपेटीत जमा करण्यात आली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .